ISSN 2454-3306

International Registered & Recognized Research
Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO ASIAN RESEARCH REPORTER

(UGC Approved,Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - III, Issue - VI, Vol.- II Impact Factor 5.25 (GRIFI) June 2018 To May 2019

EDITOR IN CHIEF

Dr. Satish G. Gavhane

Issue : VI,Vol. II
IARR
IMPACT FACTOR
5.25
ISSN 2454-3306
June 2018 To May 2019

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Towards Green HRM<br>**Dr. Mamata J. Rathi** | 1 |
| 2 | Cashless Payment in India: An Overview<br>**A.C. Sannake** | 9 |
| 3 | **Services Exports Performance of India**<br>**Dr. D. P. Takale, Shivaji Kakade** | 14 |
| 4 | Role of Water Conservation for Agriculture Sector<br>**Dr. Ashok Shivaji Jadhav** | 19 |
| 5 | Role of Commercial Banks in Financial Inclusion an Indian Economy<br>**Bhairavnath B. Mote** | 24 |
| 6 | भारतातील औद्योगिक विकासाची प्रवृत्ती<br>**डॉ. एम.एल. यादव, डॉ. डी.बी. गरबडे** | 30 |
| 7 | भारतीय महिला उद्योजकांच्या समस्या व स्थिती<br>**डॉ. रेखा आप्पासाहेब कढणे** | 38 |
| 8 | जागतिकीकरण (जागतिक स्पर्धा) आणि भारतीय उद्योग : एक अभ्यास<br>**सुधीर आगळे** | 42 |
| 9 | ई-वाणिज्य : काळाची गरज<br>**श्रीमती मीनाक्षी प्रल्हादराव शिंदे** | 46 |
| 10 | स्टेट बँक ऑफ इंडिया आणि त्याच्या सहयोगी बँकांच्या एकत्रीकरणाचे विश्लेषण<br>**बाळासाहेब विश्वनाथ खोसे** | 51 |
| 11 | **शेतकरी आत्महत्या - एक गंभीर समस्या**<br>**डॉ. अनंत नरवडे** | 53 |
| 12 | भारताचा मानव विकास निर्देशांक<br>**डॉ. प्रमोद बालाजीराव बेरळीकर, प्रमोद केशवराव मुळे** | 59 |
| 13 | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीची भूमिका<br>**डॉ. शिवाली पाते** | 61 |
| 14 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक समस्या<br>**अंकुश तु. करणे** | 66 |
| 15 | महाराष्ट्रातील तेलबिया पिकांचा आकृतिबंध अभ्यास<br>**एल्. एस्. सिताफुले** | 74 |

sian Research Reporter (IARR) (59)
IMPACT FACTOR 5.25
ISSN 2454-3306
Indo Asian Research Reporter (IARR)
Issue : VI, Vol.II
June 2018 To May 2019
www.irasg.com

Research Paper 12 Economics

# भारताचा मानव विकास निर्देशांक

**डॉ. प्रमोद बालाजीराव बेरळीकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय,
उस्मानाबाद, उस्मानाबाद

**प्रमोद केशवराव मुळे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
तुळजापूर, जि. उस्मानाबाद

**प्रस्तावना :-**

सन १९९०-९१ पासून संयुक्त राष्ट्र संघाच्या विकास कार्यक्रमातंर्गत मानव विकास अहवाल दरवर्षी प्रकाशित केला जातो. आर्थिक विकास मोजण्याचे जे विविध माध्यम किंवा साधने त्यात प्रामुख्याने स्थूल राष्ट्रीय उत्पादन (GNP) दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांक ही आहेत. मानव विकास निर्देशांकाची संकल्पना स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पनेपेक्षा खूपच व्यापक आहे. कारण मानव विकास निर्देशांकामध्ये उत्पन्नाबरोबरच दीर्घ आणि निरोगी जीवन (जीवनमान), ज्ञानाची सुगमता (शिक्षण) आणि चांगले राहणीमान (क्रयशक्ती) या बाबी समाविष्ट आहेत. मानव विकास निर्देशांकाची संकल्पना मांडण्याचे श्रेय १९९८ चे नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन आणि अर्थतज्ञ श्री. महबूब उल हक यांच्याकडे जाते.

महबूब उल हक यांच्या मते, आर्थिक वृध्दी आणि मानव विकास यातील मुलभूत फरक म्हणजे आर्थिक वृध्दीचा संबंध फक्त उत्पन्नाच्या वाढीशी आहे. मानव विकासाचा संबंध मात मानवी जीवनाशी निगडित आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक घटक जे मानवी जीवनाची गुणवत्ता वाढवतात.

**गृहितके :-**

१) भारताच्या मानव विकास निर्देशांकात वाढ होत आहे.
२) विकसित राष्ट्रापेक्षा भारताचा मानव विकास निर्देशांक कमी आहे.
३) भारतातील वेगवेगळ्या राज्यात मानव विकास निर्देशांकात खूप मोठी तफावत आहे.
४) भारताच्या मानव विकास निर्देशांकात वाढ होण्यासाठी शिक्षण, आयुर्मान, स्थूल देशी उत्पादनात वाढ होणे आवश्यक आहे.

**संशोधन साधने व संशोधन पध्दती :-**

भारताचा मानव विकास निर्देशांक हा शोधनिबंध लिहिण्यासाठी माहिती संकलनाच्या प्राथमिक व द्वितीयक

साधनसामग्रीपैकी द्वितीयक सामग्रीचा वापर केला आहे. विषयावर आधारित संदर्भग्रंथ, पुस्तके, विविध लेख इत्यादीचा वापर केला आहे. विश्लेषणात्मक पध्दती संशोधनासाठी वापरलेली आहे.

**भारताचा मानव विकास निर्देशांक :-**

मुलभूत आर्थिक सुविधांची उपलब्धी आणि मानवी विकास निर्देशांक यांचा परस्पर सह-संबंध आहे. त्यादृष्टीने भारताच्या मानव विकास निर्देशांकाचा अभ्यास करणे उपयुक्त ठरेल. सन १९९० पासून आजपर्यंत भारताचा मानव विकास निर्देशांक वाढत आहे.

**तक्ता क्रमांक १.१**

**भारताचा मानव विकास निर्देशांक**

| सन | मानव विकास निर्देशांक |
|---|---|
| १९९० | ०.४३ |
| २००० | ०.४८ |
| २०११ | ०.४६ |
| २०१३ | ०.५८ |

वरील तालिकेत भारताचा मानव विकास निर्देशांक स्पष्ट केलेला आहे. सन १९९० मध्ये मानव विकास निर्देशांक ०.४३ एवढा होता. सन २००० मध्ये त्यात वाढ होवून तो ०.४८ वर आला. सन २०१३ च्या आकडेवारीवरून मानव विकास निर्देशांक ०.५८ होता.

**भारताच्या मानव विकास निर्देशांकाची विकसित राष्ट्रांशी तुलना :-**

सन २०१३ च्या मानव विकास निर्देशांकानुसार भारताच्या मानव विकास निर्देशांकाची विकसित राष्ट्राशी तुलना करता असे दिसून येते की, भारत मध्य मानव विकास निर्देशांकात मोडतो. जगात सर्वात जास्त मानव विकास निर्देशांक नॉर्वे या देशाचा असून ०.९४ इतका आहे. जगात सर्वात कमी मानव विकास निर्देशांक नायजर या देशाचा असून या देशाचा मानव विकास निर्देशांक ०.३३ इतका आहे.

**तक्ता क्र. २.२**

**जगातील प्रमुख देशाचा मानव विकास निर्देशांक (सन २०१३)**

| देश | मानव विकास निर्देशांक |
|---|---|
| नॉर्वे | ०.९४ |
| ऑस्ट्रेलिया | ०.९३ |
| अमेरिका | ०.९१ |
| जर्मनी | ०.९१ |
| चीन | ०.७१ |
| भारत | ०.५८ |
| पाकिस्तान | ०.५३ |
| नायजर | ०.३३ |

वरील तालिकेत सन २०१३ च्या आकडेवारीनुसार भारताचा मानव विकास निर्देशांक ०.५८ इतका आहे. भारत व विकसित राट्रे यांच्या मानव विकास निर्देशांकात खूप मोठी तफावत असल्याचे दिसून येते.

**भारतातील वेगवेगळ्या राज्यातील मानव विकास निर्देशांक:-**

सन २०११ च्या आकडेवारीनुसार भारतातील विविध राज्यातील मानव विकास निर्देशांकाचा अभ्यासावरून हे स्पष्ट होते की, भारतातील वेगवेगळ्या राज्यातील मानव विकास निर्देशांकात खूप मोठी तफावत दिसून येते.

**निष्कर्ष :-**

वरील शोधनिबंधाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१) भारताच्या मानव विकास निर्देशांकात वाढ होत आहे.

२) विकसित राष्ट्रापेक्षा भारताचा मानव विकास निर्देशांकात वाढ कमी आहे.

३) भारतातील वेगवेगळ्या राज्यात मानव विकास निर्देशांकात खूप मोठी तफावत आहे.

४) भारताचा मानव विकास निर्देशांकात वाढत होण्यासाठी शिक्षण, आर्युमान, स्थूल देशी उत्पादनात वाढ होण आवश्यक आहे.